# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर मनपाचे विवीध विभाग व क्षेत्रीय कार्यालयात असलेल्या
**{सामान्य प्रशासन विभाग}** मालमत्तेचे व इमारत परिसराची देखरेख व सुरक्षेच्या दृष्टीने कंत्राटी तत्वावर खाजगी सुरक्षा एजन्सी मार्फत खाजगी सुरक्षा रक्षकांची व सुरक्षा रक्षकांवर नियंत्रण ठेवणेस्तव सुरक्षा पर्यवेक्षकांची सन २०२४ ते २०२६ या दोन वर्ष कालावधीकरीता शासनाचे किमान वेतन व इतर भत्यासह कंत्राटदाराचे सेवाशुल्काचे निविदेच्या माध्यमातून दर मागवून सेवा घेण्याचे प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. २९.०८.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

नागपूर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागामार्फत मनपाचे विविध विभाग व क्षेत्रिय कार्यालयात ०४ खाजगी सुरक्षा एजन्सी मार्फत सद्या स्थितीत ३३० खाजगी सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्यात येत आहे. उक्त निविदेत ५० सुरक्षा रक्षकांवर ०१ पर्यवेक्षकाची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित असून या दोन्ही सेवेकरिता वार्षिक खर्च रू. ९३५/- लक्ष अपेक्षीत आहे. करिता सन २०२४-२०२६ या दोन वर्षाचे कालावधीकरिता शासनाचे किमान वेतन दरानुसार कंत्राटी तत्वावर खाजगी सुरक्षा एजंन्सी मार्फत सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षकांकरिता कंत्राटदाराचे सेवा शुल्काचे ई-निविदेच्या माध्यमातून दर मागवून सेवा घेणेस्तव शासनाचे महा- टेंडरवर व स्थानिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्याचा तथा नविन निविदेचे कार्यादेश होईपर्यंत सध्या सुरू असलेल्या ०४ खाजगी सुरक्षा एजन्सीची सेवा सुरू राहाण्यास मान्यता प्रदान करण्याचा विषय प्रशासक ठरावाकरिता ठेवण्यात येत आहे.

सदर खर्च पद क्र. A२८३००१२१९०४ कार्यालय सुरक्षा व्यवस्था व्यय या पदामधून राहील.
टिप:- विस्तृत टिपणी नस्तित उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 1014/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 04/09/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर मनपाचे विवीध विभाग व क्षेत्रीय कार्यालयात असलेल्या मालमत्तेचे व इमारत परिसराची देखरेख व सुरक्षेच्या दृष्टीने कंत्राटी तत्वावर खाजगी सुरक्षा एजन्सी मार्फत खाजगी सुरक्षा रक्षकांची व सुरक्षा रक्षकांवर नियंत्रण ठेवणेस्तव सुरक्षा पर्यवेक्षकांची सन २०२४ ते २०२६ या दोन वर्ष कालावधीकरीता शासनाचे किमान वेतन व इतर भत्यासह कंत्राटदाराचे सेवाशुल्काचे निविदेच्या माध्यमातून दर मागवून सेवा घेण्याचे प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. २९.०८.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

नागपूर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागामार्फत मनपाचे विविध विभाग व क्षेत्रिय कार्यालयात ०४ खाजगी सुरक्षा एजन्सी मार्फत सद्या स्थितीत ३३० खाजगी सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्यात येत आहे. उक्त निविदेत ५० सुरक्षा रक्षकांवर ०१ पर्यवेक्षकाची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित असून या दोन्ही सेवेकरिता वार्षिक

खर्च रू. ९३५/- लक्ष अपेक्षीत आहे. करिता सन २०२४-२०२६ या दोन वर्षाचे कालावधीकरिता शासनाचे किमान वेतन दरानुसार कंत्राटी तत्वावर खाजगी सुरक्षा एजंन्सी मार्फत सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षकांकरिता कंत्राटदाराचे सेवा शुल्काचे ई-निविदेच्या माध्यमातून दर मागवून सेवा घेणेस्तव शासनाचे महा- टेंडरवर व स्थानिक वर्तमान पत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्याचा तथा नविन निविदेचे कार्यादेश होईपर्यंत सध्या सुरू असलेल्या ०४ खाजगी सुरक्षा एजन्सीची सेवा सुरू राहाण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.

(सदर खर्च पद क्र. A२८३००१२१९०४ कार्यालय सुरक्षा व्यवस्था व्यय या पदामधून राहील.)